# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक:१९६७, मुंबई ४००००१.
दूरध्वनी- २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स नं.२२६३२१०२
E_mail desk15@dte.org.in internet :- http://www.dte.org.in


अतितात्काळ

क्रमांक-१५/अर्थसं/एसटी सवलत/२०१३/32
दिनांक 15 MAY 2013

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशीक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय :- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बस प्रवासी भाड्यात देण्यात येणा-या सवलतीची प्रतिपूर्ती करण्याबाबत.

संदर्भ:- १)शासन पत्र क्र.संकिर्ण-२०१२/प्र.क्र.२१८/साशि-१, दिनांक ११/१२/२०१२
२)शासन पत्र क्र.संकिर्ण-२०१२/प्र.क्र.२१८/साशि-१, दिनांक १/१/२०१३
३)शासन अ.शा.पत्र क्र.संकिर्ण-२०१२/प्र.क्र.२१८/साशि-१, दिनांक ५/२/२०१३
४)शासन पत्र क्र.संकिर्ण-२०१२/प्र.क्र.२१८/साशि-१, दिनांक १/३/२०१३

१)विद्यार्थी मासीक पास सवलत, २)शैक्षणीक सहल, ३) विद्यार्थ्यांना मोठया सुट्टीत मुळ गावी जाणे, ४)परीक्षेला जाणे, ५)शैक्षणीक कॅंपला जाणे, ६)आजारी आई वडिलांना भेटण्यास जाण्यासाठी सवलत इत्यादीसाठी तंत्र शिक्षण संचालनालयाच्या आधिपत्याखालील शासकीय व अशासकीय संस्थांमधील विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या बस प्रवास सवलतीपोटी लागणा-या रकमेची एस.टी महामंडळाला प्रतिपूर्ती करण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्याबाबत संदर्भीय शासन पत्रान्वये या संचालनालयास कळविण्यात आले आहे. त्यानुसार आपणास कळविण्यात येते की, आपल्या विभागीय कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रातील शासकीय, अशासकीय अनुदानीत व अशासकीय विना अनुदानीत संस्थांमधील विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या वर नमूद केलेल्या सवलतींपोटी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी लागणा-या खर्चाची प्रतिपूर्ती एस.टी महामंडळास करण्यासाठी आवश्यक रकमेची आपल्या विभागाची संस्थानिहाय माहिती एकत्रीत करुन दिनांक २७-५-२०१३ पर्यंत या संचालनालयास तातडीने सादर करावी. जेणे करुन याबाबतच्या तरतुदीसाठी प्रस्ताव शासनास सादर करणे या संचालनालयास शक्य होईल.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र. संचालक.
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई.

3989
18 MAY 2013

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
क्र. तंशिसं/प्राकाना/शैवि3/2013/1452
दि. 20 MAY 2013

प्रतिः— शासकीय , अशासकीय अनुदानित , अशासकीय विना अनुदानित संस्था यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता. त्यांना कळविण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे माहिती त्वरित या कार्यालयास कळवावी, जेणे संबंधित माहिती वरिष्ठ कार्यालयास सादर करणे सुलभ होईल.

(गुलाबराव ठाकरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर.